मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शनिवार, दि. 21 सप्टेंबर 2024 | पान- 1

# शहराध्यक्षासह आमदारांबाबत अफवा पसरविणाऱ्यांची चौकशी करा

## माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांची पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याकडे मागणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहर भाजपचे अध्यक्ष शंकर जगताप आणि चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी जगताप यांच्यासंदर्भात जाणीवपूर्वक अफवा आणि खोटे वृत्त पसरविण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामाध्यमातून भारतीय जनता पक्षालाही नाहक बदनाम करण्याचे षडयंत्र दिसून येत आहे. त्यामुळे अशाप्रकारे खोटे वृत्त पसरविणाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी, भारतीय जनता पक्षाचे माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांनी केली आहे.

यासंदर्भात नामदेव ढाके यांनी पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आणि निवेदन दिले आहे. सदर निवेदनात ढाके यांनी म्हंटले आहे की, दोन दिवसांपूर्वी बुधवारी (दि. १८ सप्टेंबर) व्हाट्सअप या समाजमाध्यमावर ९३७३९४१३८१ या मोबाईल क्रमांकावरून भारतीय जनता पक्षाच्या आमदार अश्विनी जगताप आणि त्यांच्या समवेत पक्षाचे २० नगरसेवक पक्ष सोडणार असल्याचे खोटे वृत्त पसरविण्यात आले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपाला बदनाम करण्यासाठीचा हा खोडसाळपणा सदर मोबाईलधारकाने जाणीवपूर्वक केला.

भाजप शहराध्यक्ष, आमदार, २० नगरसेवक यांचे कोणतेही पत्र अथवा संमती नसताना देखील अशाप्रकारचे खोटे वृत्त समाजमाध्यमांद्वारे पसरवून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करणे व पक्षाची आणि शहराध्यक्ष तथा आमदार यांची प्रतिमा मलिन हा चुकीचा हेतू सदर मोबाईलधारकाचा दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित मोबाईलक्रमांक धारकाची सखोल चौकशी करून त्याच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नामदेव ढाके यांनी पोलीस आयुक्तांकडे केली आहे.

सदर निवेदनावर माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, संतोष कांबळे, हर्षल ढोरे, शारदा सोनवणे, माधवी राजापुरे, अंबरनाथ कांबळे, महेश जगताप, उषा मुंढे, शशिकांत कदम, सागर आंघोळकर, निर्मला कुटे, शत्रुघ्न उर्फ बापू काटे, आरती चोंधे, ममता गायकवाड, कांतीलाल भूमकर, झामाताई बारणे, अभिषेक बारणे, मनीषा पवार, तानाजी बारणे, संदीप गाडे, नीता पाडाळे, विनोद तापकीर, देविदास पाटील, सविता खुळे, बाबासाहेब त्रिभुवन, संदीप नखाते, राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, मोरेश्वर शेडगे, विठ्ठल भोईर, अश्विनी चिंचवडे, सचिन चिंचवडे, करुणा चिंचवडे, मोनाताई कुलकर्णी, बिभीषण चौधरी, संगीता भोंडवे, बाळासाहेब ओव्हाळ आदी माजी नगरसेवक, स्वीकृत सदस्य पदाधिकारी यांच्या या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# चिंचवड विधानसभेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा दावा

## निवडणूक लढण्यावर माजी विरोधी पक्षनेते नाना काटे ठाम




**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार हे चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या जागेची मागणी करणार आहेत. याबाबत माझे अजित पवार यांच्याशी बोलणे झाले आहे. मला काम करण्याची सूचना त्यांनी केली आहे. त्यामुळे चिंचवड मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस दावा करणार असल्याचे माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

नाना काटे म्हणाले, चिंचवड मतदारसंघ हा भाजपचा बालेकिल्ला नाही. त्यावर कोणाची मक्तेदारी नसती. प्रत्येक निवडणुकीत वेगवेगळे फंडे वापरुन निवडून येण्याची यंत्रणा राबविली जाते. त्याला बालेकिल्ला म्हणता येणार नाही. चिंचवड मतदारसंघ भाजपला मिळाली तरी देखील मी निवडणूक लढविण्यावर ठाम आहे.

कोणत्या चिन्हावर निवडणूक लढणार याबाबत परिस्थितीनुसार निर्णय घेणार आहे. माझ्यासमोर अनेक पर्याय आहेत. बाकीचे पक्ष आहेत. अजित पवार यांच्याशी चर्चा करुन पुढील निर्णय घेईल. महाविकास आघाडीचाही पर्याय माझ्यासमोर असू शकतो. महायुतीच्या बैठकीत चिंचवडची जागा भाजपला सुटल्यास त्यावेळी माझी भूमिका जाहीर करेल असेही नाना काटे म्हणाले.

# महापालिकेतील 'या' चार अधिकाऱ्यांच्या बदल्या



**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेतील दोन सहायक आयुक्त आणि दोन प्रशासन अधिकाऱ्यांची बदली (PCMC) झाली आहे.

कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांची कोल्हापूर महापालिकेत उपायुक्तपदी बदली झाली आहे. तर, स्थानिक स्वराज्य संस्था कर (एलबीटी) विभागाचे सहायक आयुक्त विनोद जळक यांची सातारा जिल्ह्यातील कोरेगाव नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी बदली झाली आहे.

तर, क्षेत्रीय अधिकारी असलेल्या प्रशासन अधिकारी सुचेता पानसरे यांची पनवेल महापालिकेच्या सहाय्यक आयुक्तपदी बदली झाली आहे. तर, प्रशासन अधिकारी अंकुश जाधव यांची नवी मुंबई महापालिकेत सहायक आयुक्तपदी ( PCMC) बदली झाली आहे.

# ‘मुळा-मुठे’ च्या पुनरुज्जीवनातील अडथळा दूर

## एनजीटीने प्रकल्प विरोधातील पर्यावरणप्रेमींची याचिका फेटाळली : पालिकेला मिळाले सुधारित पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या कामातील मुख्य अडचण आता दूर झाली आहे. नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाविरोधात पर्यावरणप्रेमी सारंग यादवाडकर व इतरांनी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात (एनजीटी) दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आहे. तसेच महापालिकेला सुधारित पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र मिळाले असल्याने आता रखडलेल्या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचा मार्ग खुला झाला आहे.



मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला पर्यावरणप्रेमींनी विरोध करत न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकल्पाच्या विरोधात सातत्याने न्यायालयीन वाद सुरू आहेत. या प्रकल्पासाठी महापालिकेला नोव्हेंबर २०१९ मध्ये पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले होते. या प्रमाणपत्राविषयी पर्यावरणप्रेमी सारंग यादवाडकर व इतरांनी आक्षेप घेतले होते. त्यांनी ना हरकत प्रमाणपत्राविरोधात एनजीटीमध्ये याचिका दाखल केली होती. त्यानुसार एनजीटीने महापलिकेला सुधारित पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याचे आदेश दिले होते. महापालिकेने पर्यावरण विभागाकडे दुरुस्त पर्यावरण दाखल्यासाठी प्रस्ताव दाखल केला होता. त्यानुसार राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने महापालिकेला सुधारित पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र दिले. महापालिकेच्या विधी विभागाच्या वतीने ॲड. राहुल गर्ग यांनी सुधारित पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्र एनजीटीला सादर केले. तसेच यादवाडकर आणि इतरांनी दाखल केलेली याचिका निकाली काढण्याची मागणी केली. ही मागणी मान्य झाल्याने प्रकल्पाची पुढील कामे करण्याचा महापालिकेचा मार्ग मोकळा झाला आहे.

नदी पुनरुज्जीवन प्रकल्प हा नदी स्वच्छ करणे, प्रदूषणमुक्त करणे, पुराचा धोका कमी करणे, नदीकाठी सार्वजनिक क्षेत्र निर्माण करणे, पाणी टिकवून ठेवणे, नदीशी शहराची जोडणी सुधारणे आणि विद्यमान वारसा एकत्रित करणे या प्रमुख उद्देशाने एक व्यापक योजना राबविण्यात येत आहे. प्रकल्पाला ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्याने पुढील कामांचा मार्ग मोकळा झाला आहे.

### साबरमती नदीच्या धर्तीवर प्रकल्प

» पुण्यात मुळा-मुठा नदीकाठचे ४४ किमी लांबीचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या प्रकल्पास २०१८ ला मान्यता मिळाली असून यासाठी ४ हजार ७२७ कोटी रुपये खर्च येणार आहे. प्रकल्पाचे काम ११ टप्प्यात करण्यात येणार असून ११ पैकी ३ टप्प्याचे काम प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येत आहे. एका टप्प्यासाठी येणारा ७०० कोटी रुपये खर्च महापालिकेच्या निधीतून करण्याचा व उर्वरित खर्च पीपीपी तत्त्वावर करण्यात येणार आहे. एकीकडे हा खर्च होत असताना, हा प्रकल्प सातत्याने न्यायालयीन प्रक्रियेत सापडत आहे.

### न्यायालयीन लढाई

२०१९ मध्ये मिळालेल्या पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्राविरोधात पर्यावरणप्रेमी एनजीटीमध्ये.

नोव्हेंबर २०२२ मध्ये एनजीटीने महापालिकेला आवश्यक ती सुधारणा करण्यासाठी एसईआयएए संस्थेची मदत घेण्याचे आदेश.

याचिकाकर्त्यांची २०२२ मध्ये काम थांबविण्याची मागणी, मागणी एनजीटीने निकाली काढत काम सुरू ठेवण्याची परवानगी.

याचिकाकर्त्यांनी एनजीटीने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. मार्च २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली.

पर्यावरणप्रेमींनी पुन्हा एनजीटीमध्ये धाव घेत वृक्षतोडविषयी तक्रार केली होती. ही याचिकाही निकाली काढली गेली.

२०२३ मध्येही उच्च न्यायालयात याचिका दाखल करून हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी. ऑक्टोबर २०२३ मध्ये याचिका निकाली काढली.

# राष्ट्रीय स्तरावर पिंपरी-चिंचवडची ओळख ‘मेट्रो सिटी’

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा विश्वास : सोशल मीडियाद्वारे साधला पिंपरी-चिंचवडकरांशी संवाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-पिंपरी-चिंचवड मेट्रो, पंतप्रधान आवास योजना, पालखी मार्ग विकास, नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर, मुंबई द्रुतगती महामार्ग ते पुणे-नगर महामार्ग कॉरिडॉर, आंतरराष्ट्रीय सफारी पार्क असे शाश्वत विकासाचे प्रकल्प आणि महत्त्वाकांक्षी योजनांमुळे पिंपरी-चिंचवड शहराची ओळख राष्ट्रीय पातळीवर ‘मेट्रो सिटी’ म्हणून अधोरेखित होत आहे, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.

‘मेट्रो सिटी पिंपरी-चिंचवड’ या संकल्पनेसंदर्भात आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडकरांशी सोशल मीडियाद्वारे संवाद साधला. यावेळी विविध प्रकल्प, योजना, प्रस्तावित विकासकामे यावर प्रकाश टाकला आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, देशातील वाढते नागरिकरण लक्षात घेता देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी प्रमुख शहरांमध्ये मेट्रो प्रकल्पांची पायाभरणी केली. बदलत्या काळानुसार, सुरक्षित, विश्वासार्ह, कार्यक्षम, परवडणारी, प्रवासी अनुकूल आणि पर्यावरणीयदृष्ट्या टिकाऊ व जलद सार्वजनिक प्रवासी वाहतूक व्यवस्था प्रदान करणे ही काळाजी गरज आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या पुढाकाराने २०१६ साली पुणे मेट्रोचे भूमिपूजन करण्यात आले. विशेष म्हणजे, मार्च २०२२ मध्ये या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पणही झाले.



दरम्यान, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहतूक व सार्वजनिक प्रवासी सुविधा लक्षात घेता दोन्ही शहरातील नागरिक मेट्रो प्रकल्पाची आतुरतेने वाट पाहत होते. खरंतर.. २००० साली मेट्रोबाबत चर्चा सुरू झाली होती. मात्र, मोदी सरकारच्या काळात या प्रकल्पाला गती मिळाली. पिंपरी-चिंचवडमध्ये मेट्रो सुविधा सुरू होईल, असे त्यावेळी आपल्याला स्वप्नवत वाटत होते. मात्र, सर्व पिंपरी-चिंचवडकरांच्या साथीने हे शक्य झाले.

### मेट्रोचा १ कोटीहून अधिक नागरिकांना फायदा..

सुरूवातीला स्वारगेट ते पिंपरी या मार्गिकेचे पहिल्या टप्प्यात काम हाती घेण्यात आले. त्यानंतर पिंपरी-चिंचवडकरांच्या मागणीनुसार, पिंपरी ते निगडी या दुसऱ्या टप्प्यातील मार्गिकेचेही काम प्रगतीपथावर आहे. माझ्या १० वर्षांच्या कार्यकाळामध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवडची ‘कनेक्टिव्हीटी’ सक्षम करण्यासाठी मेट्रो सुविधा ‘माईलस्टोन’ ठरली आहे. मेट्रो सुविधेमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह अन्य शहरातील सुमारे १ कोटीहून अधिक लोकांना या प्रकल्पाचा फायदा होत आहे. शहराच्या विकासामध्ये हा प्रकल्प शाश्वत विकासाचे प्रतिक राहील, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

### मेट्रोच्या प्रस्तावित मार्गिकांसाठी पाठपुरावा..

आगामी काळात पिंपरी-चिंचवड शहराचा भौगोलिक विस्तार व लोकवस्ती आणि औद्योगिक पट्ट्याची ‘कनेक्टिव्हीटी’ वाढवण्याच्या दृष्टीने हिंजवडी- वाकड- पिंपळे सौदागर- नाशिक फाटा- भोसरी- चाकण आणि हिंजवडी- ताथवडे- पुनावळे- किवळे-रावेत- निगडी मार्गे चाकण आणि निगडी- त्रिवेणीनगर- कृष्णानगर- संतनगर- मोशी- चऱ्होलीमार्गे वाघोली (90 मी. रस्त्याने) असा मेट्रो सुविधेचा विस्तार व्हावा. या करीता राज्य व केंद्र सरकारकडे आपण पाठपुरावा करीत आहोत, असे आमदार लांडगे यांनी सांगितले.

> ‘‘ ऑटो हब, इंडस्ट्रिअल हब, आयटी सिटी, स्मार्ट सिटी पिंपरी-चिंचवड आता ‘मेट्रो सिटी’ होण्याकामी आम्ही पुढाकार घेणार, असे आश्वासन पिंपरी-चिंचवडकरांना दिले होते. त्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करीत आहोत. २०१४ विधानसभा, २०१७ मध्ये महानगरपालिका आणि २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत आपण पिंपरी-चिंचवडकरांनी विश्वास दाखवला. त्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करीत आहे. शहर आता मेट्रो सिटी म्हणून उदयाला आले, ही अभिमानाची बाब आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# यंदा नदीपात्रातील प्रदूषणात कमालीची घट

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचाही दुजोरा : महापालिकेनेही बनवला स्वतंत्र अहवाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याबाबत महापालिकेने यंदा पुढाकार घेतला होता. त्याला पिंपरी-चिंचवड शहरवासियांनी मोठ्या प्रमाणात साथ देऊन हा उत्सव अधिक पर्यावरणपूरक आणि प्रदूषणविहिरीत करण्यास हातभार लावला. विसर्जन घाटांवर कृत्रिम विसर्जन हौद, निर्माल्य कुंड, मूर्ती संकलन केंद्र अशा विविध पर्यायांचा वापर करत थेट नदीमध्ये मूर्ती विसर्जित करण्यावर स्वतःहून बंधने घातली. परिणामी, पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख घाटांवरती यंदा नदीपात्रातील प्रदूषणात कमालीची घट झाली आहे. याला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेही याला दूजोरा दिलेला आहे.

यावर्षी प्रथमच क्षेत्रीय कार्यालयनिहाय १५ विघटन केंद्रांची स्थापना करण्यात आली असून याठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने मुर्तीचे विघटन करण्यात आले. तसेच पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाला प्राधान्य देत अनेक मंडळांनी कृत्रिम विसर्जन हौदात मूर्ती विसर्जित केल्या. काही मंडळांनी महापालिकेच्या मुर्ती संकलन केंद्रांमध्ये तसेच स्वयंसेवी संस्थांकडे विसर्जनासाठी मूर्तीदान करण्यावर भर दिला. तर, याबाबत सामाजिक संस्थांनीही जनजागृती केली होती. त्याला मोठा प्रतिसाद मिळत यंदा अगदी कमी प्रमाणात थेट नदीमध्ये मूर्ती विसर्जित करण्यात आल्या.

दरम्यान, दीड दिवसाच्या विसर्जनाच्या दिवशीपासूनच शहरातील प्रमुख असलेल्या विसर्जन घाटावरील नदीपात्रात जाणारे मार्ग बंद करण्यात आले होते. त्या ठिकाणी कोणीही पात्रात उतरू नये यासाठी बॅरिगेट्स लावण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यापूर्वी नदीपात्रात होडीची, तराफे अशी सोय करण्यात येत होती. मात्र त्यास कोणती परवानगी दिली गेली नव्हती. तसेच, नागरिकांनी जास्तीत जास्त मूर्ती दान अथवा हौदामध्ये विसर्जित करावी यासाठी, अतिरिक्त मनुष्यबळ नेमण्यात आले होते. त्याचप्रमाणे आरोग्य कर्मचारी त्यांच्यामार्फत जास्तीत जास्त स्वच्छता याकडे लक्ष वेधण्यात आले होते.



### निर्माल्यही थेट पात्रात जाण्यापासून रोखले

» मूर्तींबरोबरच हार, तसेच इतर निर्माल्य नदीमध्ये विसर्जित होते. मात्र यंदा थेट पात्र बंद केल्याने निर्माल्य नदीमध्ये मिसळले गेले नाही. सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि आरोग्य विभागाने घाटावरती निर्माल्य गोळा केले. गेले ११ दिवस ३२ टनहुन अधिक निर्मल्य वेगळे काढण्यात आले. गेल्या वर्षी २८ टन निर्माल्य गोळा केले होते.

### मूर्तीदानाचा आकडा साडेतीन हजाराने वाढला

यावर्षी मूर्तिदान उपक्रमामध्ये नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवला. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल साडेतीन हजारांहुन अधिक मूर्ती दान करण्यात आल्या. गेल्या वर्षी अकरा दिवसांमध्ये ११ हजार ५३६ मूर्तिदान झाले होते. तर, यावेळी तो आकडा १५ हजारापर्यंत गेला आहे. शेवटच्या म्हणजे अनंत चतुर्थीच्या दिवशी सर्वाधिक ७ हजार ५३६ मूर्तीदान झाले.

> प्रत्येक घाटावरती चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच नदीपात्रामध्ये कोणाही सोडण्यात आले नव्हते. सीसीटीव्ही च्या माध्यमातून देखील देखरेख होती. त्यामुळे यंदा नदी स्वच्छ दिसत आहेत. भाविकांनी देखील या उपक्रमाला मोठा प्रतिसाद दिला. त्याचा अहवाल स्वतंत्र बनवण्यात आला आहे.
> **- चंद्रकांत इंदलकर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# महम्मद पैगंबर यांची विश्वबंधुत्वाची संकल्पना आजही आदर्शवत : अजित गव्हाणे

## हजरत महम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जुलूसमध्ये गव्हाणे यांचा सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

मानवता हा इस्लाम धर्मचा पाया आहे. हजरत मोहम्मद पैगंबर यांनी या मानवता धर्माची शिकवण आयुष्यभर दिली. संपूर्ण मानव जात ही समान असल्याची विश्वबंधुत्वाची संकल्पना मांडून शांती व एकतेचा प्रसार केला. हजरत मोहम्मद पैगंबर हे कर्ते सुधारक होते. समाजातील अनिष्ट चालीरितींना आळा घालून त्यांनी समृद्ध समाजाची पाया-भरणी त्यांनी केली. आज याच शिकवणीची नितांत गरज असल्याची भावना स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी व्यक्त केली.

पिंपरी-चिंचवड शहरात ईद-ए-मिलाद अर्थात हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती गुरुवारी (दि.१९) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड शहर जुलूस कमिटी यांच्या वतीने करण्यात आले होते. यानिमित्त मुस्लिम बांधवांनी काढलेल्या जुलूस मध्ये स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे सहभागी झाले. यानिमित्ताने माजी महापौर वैशाली घोडेकर, माजी विरोधी पक्षनेते राहुल भोसले, माजी नगरसेवक पंकज भालेकर, तानाजी खाडे, विनायक रणसुभे, पक्षाचे युवक शहराध्यक्ष इम्रान खान, युवराज पवार उपस्थित होते.

मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त जुलूस काढण्यात आला. निगडी, पिंपरी, नेहरूनगर, चिखली, कुदळवाडी तसेच दिघी भागामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हे कार्यक्रम हाजी युसुफ कुरेशी, गुलाम रसूल सय्यद, इद्रिस मेमन, जीशान सय्यद, फजल शेख, हबीब शेख अझहर खान, फारुक शेख, अकबर मुल्ला यांच्या पुढाकारातून संपन्न झाले. या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात गव्हाणे यांनी उपस्थिती दर्शवली तसेच मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.




यावेळी गव्हाणे म्हणाले मोहम्मद पैगंबर यांचे संपूर्ण जीवन आदर्शवत होते. सभ्यता, विनम्रता, शत्रूंना माफ करणे, द्वेषभावना न बाळगणे याची शिकवण त्यांनी आयुष्यभर दिली. कितीही कठीण प्रसंग आले, तरी सत्याचा मार्ग सोडायचा नाही असे ते सांगत. यांच्या विचाराचे अनुकरण करण्यासाठी मुस्लिम बांधव हजरत पैगंबर यांची जयंती साजरी करतात त्यांच्या आदर्शाचे पालन सर्वांनीच केले पाहिजे असेही गव्हाणे यावेळी म्हणाले.

# पुणेकरांना सप्टेंबर महिन्यातच 'ऑक्टोबर हीट'चा अनुभव!

## गेल्या काही दिवसांपासून वातावरणात अचानक बदल नागरिक हैराण : सर्दी, ताप, खोकला आदी आजाराने डोके वर काढले

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यापासून वातावरणात अचानक बदल झाला आहे. त्यामुळे ऐन सप्टेंबर महिन्यातच 'ऑक्टोबर हीट'चा अनुभव पुणेकरांना येत आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून किमान व कमाल तापमानात २ अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. त्यामुळे दुपारी प्रचंड उकाडा जाणवत आहे. गेल्या काही दिवसांपासून वातावरणात अचानक बदल जाणवत आहे. पारा दोन-तीन अंशाने वर चढल्याने उकाड्यात वाढ होऊन नागरिक हैराण झाले आहेत. दुपारी घराबाहेर पडल्यानंतर घामाच्या धारांनी नागरिक ओलेचिंब होत आहेत. त्यामुळे सर्दी, ताप, खोकला आदी आजाराने डोके वर काढले आहे.

खरंतर सप्टेंबर महिन्यात सर्वत्र पाऊस असतो. पण, गेल्या काही दिवसांपासून पावसाने पुण्यात विश्रांती घेतली आहे. सप्टेंबर महिन्याच्या सुरवातीला हलका ते मध्यम पाऊस झाला. पण त्यानंतर पाऊस गायबच झाला आहे. या महिन्यात नेहमी पावसामुळे सर्वत्र गारवा निर्माण झालेला असतो.



### पुण्यातील किमान व कमाल तापमान

- दि. १६ सप्टेंबर : १८.७ : २८.०
- दि. १७ सप्टेंबर : १९.३ : २८.०
- दि. १८ सप्टेंबर : १८.८ : ३१.०
- दि.१९ सप्टेंबर : २०.३ : ३०.५
- दि. २० सप्टेंबर : २०.१ : ३१.०

### पाऊस कधी परतणार!

**भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनूसार २६ सप्टेंबरपासून पुढील १०-१२ दिवस मध्य भारतामध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात देखील हा पाऊस होईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.**

परंतु वातावरणात अचानक बदल झाल्याने पुण्यात कडक उन्ह जाणवत आहे. नागरिकांना पावसाळ्याच्या दिवसात कडक उन्हाच्या झळा सोसाव्या लागत असल्याने अनेक जणांना विविध आजार जडत आहेत. सरकारी तसेच खासगी रुग्णलयांमध्ये रुग्णांची संख्या वाढत चालली आहे. सध्या एल निनो सक्रिय आहे. त्याचा हा परिणाम आहे. पॅसिफिक महासागराचे तापमान वाढले, तर वारे त्या महासागराकडे वळते. म्हणून आपल्या परिसरात पाऊस पडत नाही. पाऊस पडण्यासाठी वारे समुद्राकडून जमिनीकडे येणे अपेक्षित असते. सध्या उलट झालेले आहे.

> या आठवड्यापासून पुढे पावसाची शक्यता नाही. परतीचा पाऊस हा सायंकाळी हलका ते मध्यम स्वरूपाचा होऊ शकतो. परंतु, तो अधिक नसेल. विजांचा कडकडाट अधिक होऊ शकतात. ऑगस्टपासून ला निनो सक्रिय आहे. हिवाळ्यातही तो सक्रिय असेल.
>
> - डॉ. अनुपम कश्यपी, ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ.

# खासगी मेडिकल कॉलेजमध्ये होणार पाच पट शुल्कवाढ

## मॅनेजमेंट कोट्यातील वैद्यकीय शिक्षण महागणार : गरिबांचे डॉक्टरकीचे स्वप्न आता आवाक्याबाहेर

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या महागाईने टोक गाठले असतानाच आता वैद्यकीय शिक्षणही महागणार आहे. शुल्क नियामक प्राधिकरणाने राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांसाठी शुल्क निश्चित करून दिले आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला वैद्यकीय शिक्षण विभागानेच खासगी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी शुल्क वाढीचा निर्णय घेतला आहे.

महाविद्यालयांमधील मॅनेजमेंट कोट्याच्या जागांसाठी नियमित फीच्या पाच पट फी आकारण्यास आपली काहीही हरकत नसल्याचा निर्वाळा वैद्यकीय शिक्षण विभागाने दिला आहे. यामुळे राज्यातील खासगी विनाअनुदानित होमियोपॅथी, आयुर्वेदिक आणि युनानी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवणे आर्थिक दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी अशक्य होणार आहे.

असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र या संघटनेने वैद्यकीय शिक्षण विभागाकडे निवेदन सादर केले होते. त्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. या बैठकीत मॅनेजमेंट कोट्यासंबंधी निर्णय घेण्यात आला.



याबाबत वैद्यकीय प्रवेशासाठी इच्छुक असलेली प्रियांका भालेराव ही विद्यार्थिनी म्हणाली, वैद्यकीय महाविद्यालयांच्या मॅनेजमेंट कोट्यातील शुल्कावर राज्य सरकारचे नियंत्रण असावे. कमाल आणि किमान शुल्क मर्यादा घालून द्यावी. सामान्य कुटुंबातील विद्यार्थी प्रत्येक वर्षाला २५ लाख रुपये भरू शकत नाहीत. त्यामुळे आमचे डॉक्टर होण्याचं स्वप्न धुळीस मिळाले आहे. केवळ श्रीमंत घरातील मुलेच डॉक्टर होतील.

याबाबत वैद्यकीय प्रवेशासाठी इच्छुक असलेला दीपक काळे हा विद्यार्थी म्हणाला, अत्यंत दुर्दैवी निर्णय आहे. या निमित्ताने समाजातील आर्थिक विषमता अधोरेखीत होईल. पाच वर्षांसाठी २५ लाख खर्चून गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्याशिवाय पर्याय उरला नाही.

नाव न छापण्याच्या अटीवर एका खासगी मेडिकल कॉलेजचे डीन म्हणाले, मेडिकल कॉलेजला कुठलेही शासकीय अनुदान मिळत नाही. मॅनेजमेंट कोट्यातील शुल्क दर ३ वर्षांनी बदलतात. सरकारच्या नियमावलीनुसार ही शुल्कवाढ झाली आहे. मुळात या कोट्यातील प्रवेश हे भरमसाठ फी घेऊन केले जातात. गुणवंत गरीब विद्यार्थ्यांना अनुदानित जागांवर प्रवेश मिळतो. त्यांच्यावर अन्याय होतो हा आरोप चुकीचा आहे.

### ..तर परदेशात घ्यावे लागेल शिक्षण

**सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये जागा कमी असल्याने अनेक विद्यार्थी खासगी वैद्यकीय महाविद्यालयांकडे वळतात. अनेकदा त्यांना मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवण्याखेरीज पर्याय उपलब्ध राहात नाही. अशावेळी हे शुल्क पाचपटीने वाढले, तर अशा विद्यार्थ्यांना भारताऐवजी परदेशात जाऊन त्याच शुल्कात वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करणे सोयीचे होणार असल्याचे मत परदेशातील शिक्षणविषयक सल्लागार डॉ. सिद्धार्थ सोनवणे यांनी व्यक्त केले.**